# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ६२** **दिनांक : ०२/०९ /२०२४**

**विभाग** : मार्केट विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** चैतन्य नगर येथील ओपनस्पेस मध्ये बांधण्यात आलेल्या योगा हॉल,कलिंगा ग्रामोदय संस्था यांना महिला सक्षमीकरणासाठी विविध सामाजीक उपक्रम राबविणे करीता मिळणे बाबत.

---*---

**ठराव :-**

सावेडी भागातील चैतन्य नगर येथे महानगरपालिकेच्या सावेडी सर्व्हे नं.१०३ पैकी जागेमध्ये बांधलेल्या योगा हॉलचे क्षेत्र ३२८.७२ चौ.मी.इतके आहे.सदरचा योगा हॉल कलिंगा ग्रामोदय संस्था ,सुयोग हौसिंग सोसायटी ,प्रोफेसर कॉलनी ,सावेडी ,अहमदनगर यांनी आमची संस्था नोंदणीकृत असुन संस्थे मार्फत महिलांना तसेच युवतींना च्या कलागुणांना व आत्मनिर्भर बनविण्यासाठी विविध सामाजीक उपक्रम राबविते तसेच महिलांना योगासने व विविध व्यायाम प्रकार तसेच महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणा साठी कार्य केले जाते.यासाठी महानगरपालिकेच्या मालकीचा योगा हॉल मिळणे बाबत मागणी केली आहे.

सदर संस्थेचे सामाजिक कार्य पहाता योगा हॉल नाममात्र दराने तीन वर्षा करीता भाडेपट्टयावर देणेबाबत कार्यवाही करावी. सदर संस्था योगा हॉलचा वापर करणार असल्याने या हॉलची देखभाल दुरूस्तीचे कामे संस्थेकडून करून घेण्यात यावीत.यास मा.प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे) | (यशवंत डांगे) |
| प्र.नगरसचिव | आयुक्त तथा प्रशासक |
| अहमदनगर महानगरपालिका. | अहमदनगर महानगरपालिका. |

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ६३** **दिनांक : ०२/०९ /२०२४**

**विभाग** : उदयान विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** सी.जी.पॉवर आणि इंडस्ट्रीयल सोल्युशन्स् तर्फे पाईपलाईन रोड व कुष्ठधाम रस्त्यांच्या दुभाजकांवर वृक्षा रोपण करण्यास परवानगी मिळणे बाबत.

---*---

**ठराव :-** सी.जी.पॉवर आणि इंडस्ट्रीयल सोल्युशन्स् लि.MIDC अहमदनगर यांनी पाईपलाईन रोड श्रीराम चौक ते मनमाड रोड पर्यत रस्त्याच्या दुभाजकामध्ये वृक्षारोपण करण्यासाठी मागणी् केली आहे.सदर दुभाजकामध्ये वृक्षारोपण केल्यास हा मार्ग सुशोभित होवून शहराच्या सौंदर्यात भर पडेल.

सी.जी.पॉवर आणि इंडस्ट्रीयल सोल्युशन्स् लि.MIDC अहमदनगर यांना सदर रस्त्याच्या दुभाजकामध्ये वृक्षारोपण करण्यास परवानगी देण्यात येत आहे.सदर कंपनी कडून दुभाजकामध्ये कन्हेरची झाडे तसेच इतर शोभिवंत झाडे लावणे बाबत कार्यवाही करावी.सदर वृक्षारोपण केल्यानंतर झाडे जिवंत ठेवण्यासाठी झाडांची देखभाल करण्यात यावी.यास मा.प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ६४** **दिनांक : ०२/०९ /२०२४**

**विभाग** : घनकचरा व्यवस्थापन विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** बुरूडगांव सर्व्हे नं.३४ येथील ५० मे.टन क्षमतेचा खत प्रकल्प अदयावत करून चालविणेकामी देणे बाबतचे मे. मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. यांचे पत्राबाबत.

---*---

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या बुरूडगांव सर्व्हे नं. ३४ येथे मा.शासन मान्य घनकचरा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) नुसार १०० मेट्रीक टन व ५० मे. टन खत निर्मिती करणारा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. पैकी प्रति दिन १०० मे.टन कच-यावर प्रक्रिया करून खत निर्मिती करणारा प्रकल्प हा उभारणे व उभारणीनंतर ५ वर्षे देखभाल दुरूस्तीसह चालविणेकामी मे. मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. औरंगाबाद या संस्थेस इन्पुट बेसीस रक्कम रूपये ५९० प्रति मे.टन या दराप्रमाणे तसेच निर्माण झालेल्या खतावर रक्कम रूपये १५ प्रति मे.टन या प्रमाणे मनपास रॉयल्टी देण्यात आलेला आहे. प्रति दिन ५० मे.टन कच-यावर प्रक्रिया क्ररून खत निर्मिती करणारा प्रकल्प हा मे.आदर्श कंन्स्ट्रक्शन, पुणे या संस्थेस आउट पुट बेसीसवर रक्कम रूपये १९१५ प्रति मे.टन व खत निर्मिती नंतर विक्री केलेल्या खतावर १० टक्के रॉयल्टी मनपास देणे या प्रमाणे १ वर्षाकरिता देखभाल दुरूस्तीसह चालविण्यास देण्यात आलेला होता.

तथापी मे.आदर्श कंन्स्ट्रक्शन पुणे या संस्थेने वर्ष भरामध्ये मनपाने दिलेल्या कच-यावर कुठल्याही प्रकारची प्रक्रिया केलेली नसून त्यांनी मुदत संपल्या पूर्वीच मनपास कुठल्याही प्रकारची पूर्व सुचना न देता संस्थेचे कर्मचारी घेवून प्रकल्प बेवारस संस्थेस सोडून निघून गेले आहे. तसेच सदर संस्थेने प्रकल्प व प्रकल्पावरील यंत्र सामुग्रीचे नुकसान केलेले आहे. त्याबाबत सदर संस्थेस प्रकल्प पूर्ववत चालू अवस्थेत मनपास हस्तांतरीत करणे बाबत अंतिम नोटीस देखील बजावण्यात आलेली आहे. मे.मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर यांनी इकडेस पत्र देवून प्रतिदिन १०० मे.टन क्षमतेचा खत प्रकल्प व ५० मे.टन खत निर्मिती प्रकल्प असे दोन्ही प्रति दिन १५० मे.टन खत निर्मिती प्रकल्प चालविणेची तयारी दर्शविलेली असून प्रति दिन ५० मे.टन क्षमतेचा प्रकल्पाची दुरूस्ती करून यंत्रसामग्री अदयावत करून निश्‍चित केलेल्या रक्कम रूपये ५९० प्रति मे.टन दरामध्ये दरसाल १० टक्के दरवाढ तसेच खत निर्मितीवर रक्कम रूपये १५ प्रति मे.टन याप्रमाणे दरास मान्यता दिल्यास एकूण ७ + ३ वर्षे मुदतवाढ दिल्यास सदर दोन्ही प्रकल्प देखभाल दुरूस्तीसह चालविण्यास तयारी दर्शविलेली आहे.

मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. या संस्थेने आज अखेर व्यवस्थित रित्या कामकाज केलेले आहे. १०० मे.टन कच-यावर प्रक्रिया करणेकामी दिलेल्या कामाची मुदत २१-५-२०२५ ला पाच वर्षे पूर्ण होत आहेत. अदयापही ९ महिने काम बाकी आहे. ५० मे.टन कचरा प्रक्रिया प्रकल्प मशिनरी देखभाल दुरूस्तीसह चालविणे मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. या संस्थेने २१-५-२०२५ पासून पुढे पाच वर्षे चालविणेस मागणी केलेली आहे. सध्या विधानसभेची आचार संहिता लागण्याची शक्यता असल्यामुळे सदर नव्याने निविदा प्रक्रिया करणेस विलंब लागू शकतो व मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. या संस्थेचा कामाचा पूर्वानुभव लक्षात घेता तसेच सदर संस्थेचे कामकाज समाधान कारक असल्याने बंद पडलेला ५० मे.टन कचरा प्रक्रिया प्रकल्प सध्याच्या दराप्रमाणे २१-५-२०२५ पर्यत चालविणेस देणेस मान्यता देण्यात येत आहे. रॉयल्टीचा दर प्रति टन रूपये १५ व प्रक्रिया खर्च रूपये ५९० इनपुट बेसीसवर देणे मान्यता देण्यात येत आहे.

या बाबत अंमलबजावणी करणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
# नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ६५** **दिनांक : ०२/०९ /२०२४**

**विभाग** : आस्थापना विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** श्री मेहेर गंगाधर लहारे सहाय्यक आयुक्त यांचे पदाच्या मान्यते बाबत .

---*---

**ठराव :-**

वरील विषयान्वये अहमदनगर महानगरपालिका पदोन्नती समिती यांचा दिनांक ०५-०३-२०२४ , ०७-०३-२०२४ व १४-०३-२०२४ च्या अनुशंघाने पदोन्नती समितीच्या सभावृत्तांनुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध संवर्गाच्या पदांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यानुसार आस्थापना विभाग /कार्यासन -३/जा.क्र. २१५४ दि. २६-०७-२०२४ रोजीच्या आदेशान्वये श्री मेहेर गंगाधर लहारे प्रभाग अधिकारी यांना सहाय्यक आयुक्त पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ व ५४ नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर कार्यरत आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहीत आहे. त्यानुसार सदर प्रस्तावाच्या अनुशंघाने श्री मेहेर गंगाधर लहारे सहाय्यक आयुक्त यांचे सहा.आयुक्त या पदावर पदोन्नतीस मान्यता देणेकामी मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.

| | |
|---|---|
| | # अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर<br>## नगरसचिव विभाग |

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ६६** **दिनांक : ०२/०९ /२०२४**

**विभाग** : बांधकाम विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०२४-२०२५ प्रस्तावित विकास कामांस प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत

---*---

**ठराव :-**

नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०२४-२०२५ अंतर्गत रक्कम रूपये १५,८३,८४,४२३/- इतके अनुदान अनुज्ञेय आहे. याबाबत मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडून महानगरपालिकेस पत्र प्राप्त झाले आहे. सदर योजनेतून विकास कामे सादर करणे बाबत कळविले आहे. सदर योजनेतून खालील कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत. सदर कामांची इतर कोणत्याही शासकीय यंत्रणेस एनओसी देण्यात आलेली नाही. तसेच कामाची द्विरूक्ती होत नाही याची खात्री करण्यात येत आहे. सदर विकास कामांच्या प्रस्तावास मा.महासभेची मंजूरी आवश्यक आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| ०१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१४ मधील चिपाडे गिरणी ते गणेश राउत घर ते गायाकवाड घर ते ज्ञानेश्वर शेटे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | २४९००००/- |
| ०२ | अहमदनगर महानगरपलिका हद्दीतील प्र.क्र.१४ मधिल उषा प्राईड ते चंद्रकांत बोरा घर ते दिपक शिंदे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १४५२१५७/- |
| ०३ | सार्वजनिक वाचनालय ते गुळमिरे घर ते आरे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | ३९५२०४९/- |
| ०४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१४ मधील सारसनगर येथील साईनगर परिसरातील अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | १४२०५८५/- |
| ०५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१४ मधील मधुबन कॉलनी येथील ढाळे घर ते निगुडे घर ते देशमुख घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ५५०३३५१/- |
| ०६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१४ मधील बुरूडगांव रोड परिसरातील अकोलकर हॉस्पिटल ते केअर हॉस्पिटल अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २२६८२८३/- |

| | | |
|---|---|---|
| ०७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१४ मधील विनायक नगर येथील मातोश्री उदयान येथे मल्टीपर्पज हॉल बांधेणे | ७४९९०७९/- |
| ०८ | प्र.क्र.९ मध्ये डॉ.दिपक सिध्दवरम महाविर कॉलनी अंतर्गत रस्ता विकसीत करणे. | २४९८०८५/- |
| ०९ | प्र.क्र.१० मध्ये लालटाकी भारस्कर कॉलनी अंतर्गत रस्ता विकसीत करणे व ड्रेनेज लाईन करणे | ५४९९६२/- |
| १० | प्र.क्र.०७ मध्ये सोमनाथ कराळे घर ते दत्त मंदीर ते मिसाळ घ्रर ते रामवाडी रस्ते विकसीत करणे. | ५९९९४५७/- |
| ११ | प्र.क्र.०७ मध्ये ज्ञानेश्वर मंदीर परीसरात धामने घर ते शिंदे घर ते चक्रनारायण घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १९९९८८२/- |
| १२ | प्र.क्र.३मध्ये मेअराज नगर अंतर्गत ३०० एम.एम.ड्रेनेज लाईन करणे | १२९८७३१/- |
| १३ | प्र.क्र.१४ मध्ये भवानी नगर येथील जिजामाता उदयान विकसीत करणे | १९९९८७३/- |
| १४ | प्र.क्र.१४ मध्ये तवले घर अदापुरे घर ते वाडे घर रस्ता विकसीत करणे | ३०९९१४८/- |
| १५ | प्र.क्र.१ मध्ये पाईपलाईन रोड येथील हनुमाननगर येथे डोके घर ते वाबळे घर रस्ता विकसीत करणे. | २४९९८२६/- |
| १६ | प्र.क्र.३ मध्ये मुकुंदनगर परीसर अंतर्गत रस्ता विकसित करणे | २३९९८४०/- |
| १७ | प्र.क्र.३ दगडीचाळ परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | २४९९९३०/- |
| १८ | प्र.क्र.०३ मध्ये आकसा मंजील परिसर ते शरातील पार्क परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ११०८१३०/- |
| १९ | प्र.क्र.०३ मध्ये गजानन सोसायटी अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरणे करणे | २३९९५००/- |
| २० | प्र.क्र.०३ मध्ये नशेमन कॉलनी छोटी मरियम मस्जिद आणि शहा कॉलनी परिसरात कॉक्रीटीकरण करणे आणि पेव्हिंग ब्लॉक बसविणे आणि अंतर्गत भूमीगत गटार करणे. | १६५४२००/- |
| २१ | प्र.क्र.८ मध्ये दत्त कॉलनी वाघ घर ते शिंगवी घर अंतर्गत रस्ता विकसीत करणे | ९९९६१०/- |
| २२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील रेसिडेन्सीयल कॉलनी समोरील चौथे शिवाजी महाराज स्मारक विकसीत करणे | ७९९९३०७/- |
| २३ | प्र.क्र.१४ मध्ये सारसनगर येथील राजधन हॉटेल ते आनंद पार्क रस्ता कॉक्रीटीरण करणे | ४९९६७१/- |
| २४ | प्र.क्र.६ मध्ये भूतकरवाडी येथे रणजीत अपार्टमेंट समोर सभा मंडप बांधणे | १९९७५९६/- |
| २५ | प्र.क्र.३ मध्ये मुकुंदनगर अंतर्गत शकील शेख घर ते हाजी नदीम घर ते फारूक भाई घर रस्ता विकसीत करणे | ५९९०९०/- |
| २६ | प्र.क्र.१४ मध्ये सर्व्हे नं.५४/१ मधील ओपनस्पेस विकसीत करणे | ४०९७७८०/- |
| २७ | प्र.क्र.५ मध्ये वेदुवाडी जवळ,गुरूकृपा कॉलनी जैन धर्मस्थानक येथे ३०० एम एम ड्रेनेज लाईन टाकणे | ८४९७५०/- |

| | | |
|---|---|---|
| २८ | प्र.क्र.१० मध्ये जे.जे.कॉलनी येथील सुरसे घर ते गवडी घर रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ४९९६७१/- |
| २९ | प्र.क्र.१० मध्ये सरदार पटेल चौक ते आर्शिवाद आटा दुकान अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे | ६९९७६५/- |
| ३० | प्र.क्र.०७ मध्ये राघवेंद्र स्वामी नगर ओपनस्पेस सुशोभिकरण करणे | ९९९६१०/- |
| ३१ | प्र.क्र.०७ मध्ये भगवान बाबा चौक ते बडे घर ड्रेनेज करणे | २३१००५१/- |
| ३२ | प्र.क्र.०७ मध्ये साईनगर पाण्याच्या टाकी जवळील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ९९९६१०/- |
| ३३ | प्र.क्र.१५ साताळकर हॉस्पिटल जवळ डॉ.फाटके घर येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे व ओपनस्पेस विकसीत करणे | १७९९३३७/- |
| ३४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील राष्ट्र माता जिजाबाई शहाजीराजे भोसले हॉस्पिटल परिसर विकसीत करणे | ३४२५७०३३/- |
| ३५ | प्र.क्र.१४ मध्ये भवानीनगर येथे पेव्हिंग ब्लॉक ,कॅट आय आणि रोड मार्किग करणे | ८४९१८३/- |
| ३६ | वाडीया पार्क तालीम सुशोभिकरण करणे | ४९९४२८/- |
| ३७ | प्र.क्र.१५ मध्ये सर्व्हे नं.२२/२ रभाजी नगर रेणूका कॉलनी येथे दत्त मंदिर परीसरात पाठक घर ते जावळे घर ते जाधव घर ३०० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणे | २२४९३२६/- |
| ३८ | प्र.क्र.१२ मधील आनंद किराणा ते कोके कॉम्प्लेक्स ते अजय मेडीकल पर्यत रस्ता विकसीत करणे | १७९९२८५/- |
| ३९ | प्र.क्र.१२ मधील तिवारी भोजनालय ते गुलशन घर ते दरक घरापर्यत रस्ता विकसीत करणे | २७९९७९६/- |
| ४० | प्र.क्र.१४ मध्ये भवानीनगर येथे पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन व वॉल टाकणे | १३१५८३/- |
| ४१ | प्र.क्र.१४ मध्ये संदिप नगर येथे पाईपलाईन टाकणे वॉल बसविणे | ९५७९८/- |
| ४२ | प्र.क्र.१० मधील बाराईमाम दर्गा येथील परिसरातील पाया व सुविधा बाबत (अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे ) | २९९७४७६/- |
| ४३ | प्र.क्र.१ तागड वस्ती व कादंबरी २ अंतर्गत ड्रेनेज लाईन करणे रस्ते कॉक्रीटीकरण करणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ५९९८९९८/- |
| ४४ | प्र.क्र.१४ मध्ये काळे गल्ली ,मच्छिन्द्रनाथ गल्ली व अशोकराव भोसले चौक ते भोसले डिलाईट रस्ते विकसीत करणे | ११९९८४६७/- |
| ४५ | प्र.क्र.१ मधील हॉटेल नगर व्हिलेज ते उजाला अपार्टमेंट पर्यत ड्रेनेजलाईन टाकणे | १९९९१९६/- |
| ४६ | प्र.क्र.१ मधील अनुरोन अपार्टमेंट ते जाधव मळा पर्यत कॉक्रीटीकरण करणे | १९९८९९२/- |

| | | |
|---|---|---|
| ४७ | प्र.क्र.१७ मध्ये आरणगांव रोड ते सुर्यवंशी घर ते गाडेकर घर ते बनकर घर ते गंगावणे घर ते परमेश्वर विधाते रो हाउस पर्यत ३०० एम.एम.ड्रेनेज लाईन करणे | ५९८३३१७/- |
| ४८ | प्र.क्र.१७ मध्ये बाळकृष्ण लोंढे घर ते रायकर घर ते बनकर घर ते दत्तात्रय जाधव घर ते दत्तात्रय विधाते घर ते योगेश घुले ते गोरे घर ते शिंदे रो हाउस ते दत्तात्रय गिरमे घर ते विधाते घर ३०० एम.एम.ड्रेनेज लाईन टाकणे | ६९९९६६/- |
| ४९ | प्र.क्र.१४ मधील भगवान बाबा चौक येथील लिंबाचा मारूती मंदिर येथे संरक्षण भिंत बांधणे व सुशोभिकरण करणे. | २४९८५८८/- |
| ५० | प्र.क्र.९ मधील सर्जेपुरा येथील भाकरे गल्ली येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे | १९९८९९२/- |
| ५१ | प्र.क्र.३ मध्ये रचना हौसिंग सोसायटी फकिरवाडा येथे गुलशन भाभी घर ते फारूक घर ते नसरीन घर ते मेंन रोड बंद पाईप गटर करणे व कॉक्रीटीकरण करणे | ३९९६२६/- |
| | **एकुण रक्कम रू.** | **१५,८१,९७,९६६/-** |

तरी वर नमुद विकास कामांचा प्रस्ताव नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०२४-२०२५ अंतर्गत सादर करणे कामी मा.सहाय्यक संचालक नगररचना यांचा अभिप्राय घेवून सदर विकास कामांना तांत्रिक मान्यता प्रदान करून रक्कम रूपये १५,८१,९७,९६६/- (अक्षरी रक्कम रूपये पंधरा कोटी ऐंक्याऐंशी लाख सत्यान्नव हजार नउत्र्शे सहासष्ठ मात्र ) खर्चाचा प्रस्ताव व जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत सह.आयुक्त ,नगरपालिका प्रशासन कार्यालयाकरिता रूफ टॉप सोलर सिस्टीम बसविणचे रक्कम रूपये १०,००,०००/- (अक्षरी रू. दहा लाख मात्र ) चा प्रस्ताव तयार करून तांत्रिक मान्यतेसह सदर योजने अंतर्गत मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे कामी मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.